# मेट्रो विकासाचा धडाका सुरूच

## 'मेट्रो-३'चे १९ वे भुयार खणून पूर्ण

**मुंबई, दि. ३ (विशेष प्रतिनिधी)** : मुंबईच्या भूगर्भात उभारण्यात येणाऱ्या 'मेट्रो-३' मार्गिकेवरील १९ वे भुयार गुरुवारी खणून पूर्ण झाले. दक्षिण मुंबईतील विधानभवन आणि मंत्रालय परिसराच्या जमिनीखालून हे भुयार खणण्यात आले. यामुळे 'मेट्रो-३' प्रकल्पातील ३६ किमीचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

'कुलाबा-वांद्रे-सिप्झ' या दरम्यान धावणारी 'मेट्रो-३' ही मार्गिका देशातील पहिली पूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिका आहे. या मार्गिकेच्या निर्माणाकरिता सध्या मुंबईत जमिनीपासून ३० ते २० मीटर खाली भूगर्भात १७ 'टनल बोअरिंग मशीन' (टीबीएम) कार्यरत आहेत. या कामाअंतर्गत



जमिनीखाली दोन भुयारे खणण्यात येत आहेत. या संपूर्ण प्रकल्पाची लांबी ३३.५ किमी असली, तरी दोन भुयारे मिळून एकूण ५२ किमीचे खोदकाम मेट्रो-३ प्रशासनाला करावयाचे आहे. या ५२ किमीपैकी गुरुवारी ३६ किमीच्या भुयारीकरणाचे काम फत्ते झाले. तीन महिन्यांपूर्वी विधानभवन येथील विवरातून भूगर्भात सोडलेले 'सूर्या-१' हे टीबीएम यंत्र गुरुवारी दुपारी चर्चगेट येथे जमिनीबाहेर पडले.

गेल्या १० दिवसांमध्ये 'सूर्या-१' 'टीबीएम'ने ४९९ मीटरचे भुयारीकरण पूर्ण केले. दक्षिण मुंबईतील विधानभवन ते चर्चगेट दरम्यानच्या महत्त्वाच्या परिसराखालून अत्यंत सुरक्षितपणे या 'टीबीएम' यंत्राने मार्गक्रमण केले. 'मेट्रो-३' प्रकल्पात एकूण ३२ भुयारे खणण्यात येणार आहेत. त्यापैकी शुक्रवारी १९ वे भुयार खणून पूर्ण झाले आहे. 'टीबीएम' यंत्राचा प्रतिदिवस भुयारीकरणाचा वेग १० मीटर एवढा आहे. ही यंत्रे २० मीटर जमिनीखाली बेसॉल्ट आणि ब्रेसिया या कठीण दगडांतून मार्गक्रमण करतात.